सकाळ दि० ९/११/१५

# समाजाभिमुख संशोधन हवे

## प्रकुलगुरू डॉ. तिडके : आंतरमहाविद्यालयीन आविष्कार स्पर्धांचा समारोप

**अमरावती, ता. ८ :** राष्ट्रोन्नतीसाठी समाजाला आवश्यक असलेल्या बाबींवर संशोधन होणे गरजेचे आहे. समाजाच्या गरजा ओळखून त्यावर विद्यार्थ्यांनी संशोधन करावे, असे प्रतिपादन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. जयकिरण तिडके यांनी केले.



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात आंतरमहाविद्यालयीन आविष्कार स्पर्धांचा प्रकुलगुरू डॉ. तिडके यांच्या उपस्थितीत नुकताच समारोप झाला, त्या वेळी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. व्यासपीठावर कुलसचिव डॉ. अजय देशमुख, बीसीयूडी संचालक डॉ. राजीव सपकाळ, समन्वयक डॉ. आनंद अस्वार उपस्थित होते.

कुलसचिव डॉ. अजय देशमुख म्हणाले, संशोधन हा महत्त्वाचा विषय असल्याने समाज व राष्ट्राचा विकास होतो; परंतप संशोधनाकडे वळण्याचा कल हा कमी झाल्याने पुरेसे संशोधक तयार होत नाहीत. यामुळेच विद्यार्थ्यांत संशोधनवृत्ती वाढीस लागावी. यासाठी आविष्कार स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. डॉ. आनंद अस्वार यांनी यशस्वी राष्ट्र उभारणीत पाच ईला महत्त्व असल्याचे सांगितले. जागतिक स्पर्धेत आपल्याला टिकायचे असेल तर प्रदर्शन व सादरीकरण कौशल्य आत्मसात करावे लागेल, तेव्हाच आपण आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले कार्य पोहचवू शकू, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. संचालन डॉ. एन. आर माणिक यांनी केले.